पुढारी

# रवळनाथच्या सर्व शाखांमधून सोने तारण कर्जाची परवानगी : चौगुले

**कुडाळ : पुढारी वृत्तसेवा**

श्री रवळनाथ को-ऑप, हौसिंग फायनान्स सोसायटीला सोनेतारण कर्ज देण्यास परवानगी दिली आहे. त्यानुसार संस्थेच्या सर्व शाखेत सोने तारण कर्जाची सुविधा उपलब्ध केली आहे. अशी माहिती संस्थापक अध्यक्ष एम.एल. चौगुले यांनी दिली.



सहजवसुलभपध्दतीने गृहकर्जउपलब्धकरणे हाच प्रमुख उद्देश डोळ्यासमोर ठेवुन संस्थेची स्थापना केली आहे. गेल्या २५ वर्षात आजअखेर संस्थेच्या अर्थसहाय्यातून सुमारे ३२०० घरकुले उभी राहिली आहेत. त्यापैकी २५० पेक्षा जास्त घरे ही सैन्यदलातील जवान व पोलीसांची आहेत. काही सभासद, ठेवीदार व कर्जदार व ग्राहक यांचेकडून सोनेतारण कर्जाविषयी संस्थेकडे वेळोवेळी विचारणा झाली. त्यामुळेच सोने तारण कर्ज सुरू करण्यास केंद्रिय निबंधकांची परवानगी मागितली होती. त्याला मंजुरी मिळाली आहे. त्यानुसार संस्थेच्या गडहिंग्लज, आजरा, चंदगड, नेसरी, कोल्हापुर, जयसिंगपुर, बेळगांव,निपाणी, कुडाळ व सुविधा केंद्र गडहिंग्लज या १० शाखेत सोनेतारण कर्जाची सुविधा उपलब्ध केली आहे.

घराचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर सोलर सिस्टीम, टि.व्ही, फ्रिज आणि वॉशिंग मशिन इत्यादी वस्तुंसाठी कर्जदारांना अन्य बँका, पतसंस्थांकडे कर्ज घ्यावे लागत होते.

त्यामुळे गृहोपयोगी उपकरणांच्या खरेदीसाठी योग्य दरात कर्ज देण्याचा निर्णय संस्थेने घेतला असुन त्यालाही केंद्रिय निबंधकांनी मंजुरी दिली आहे. असेही श्री. चौगुले यांनी सांगितले. उपाध्यक्ष प्रा.व्ही. के.मायदेव, मुख्य कार्यकारी अधिकारी डी. के.मायदेव, सर्व संचालक, सल्लागार, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**५० लाखांपर्यंत शैक्षणिक कर्ज**

यापूर्वी सभासदांच्या पाल्यांच्या उच्च शिक्षणासाठी २५ लाखापर्यंत कर्ज दिले जात होते. आता ५० लाखापर्यंत शैक्षणिक कर्ज देण्यासंदर्भात पोटनियम दुरूस्तीला केंद्रिय निबंधकांनी मंजुरी दिली आहे असेही श्री. चौगुले यांनी सांगितले.

**सोने तारण कर्ज सुविधा का?**

घर बांधणाऱ्या बहुतेकांची शेवटच्या टप्यात अडचण होते. शेवटच्या टप्यातील कामे पूर्ण करणे, वास्तुशांती इत्यादीसाठी आर्थिक अडचण उद्‌भवते. अशावेळी तातडीने अर्थसहाय उपलब्ध होण्याचा एकमेव मार्ग म्हणून सोने गहाण ठेवून तात्पुरत्या अडचणीवर मात करण्याकडे अनेकांचा कल असतो. म्हणुनच सोनेतारण कर्ज सुविधा सुरू केल्याचे श्री. चौगुले यांनी स्पष्ट केले.